

# SHIKSHAN MAHARSHI GURUVARYA R G SHINDE MAHAVIDYALAYA,

# PARANDA DIST. OSMANABAD (MS)-413502

**Telephone: 02477 232143**
**E-mail: shindecollege067@rediffmail.com Website: https://www.rgsmparanda.org/**

**NAAC Reaccredited with 'A' grade with CGPA 3.15 in 3rd Cycle**

# AQAR 2022-23

# CRITERION 3

## RESEARCH, INNOVATIONS AND EXTENSION

3.4.3 - Number of extension and outreach programs conducted by the institution through NSS/NCC/Red cross/YRC etc., ( including the programmes such as Swachh Bharat, AIDS awareness, Gender issues etc. and/or those organized in collaboration with industry, community and NGOs ) during the year

Submitted to

**NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL**

श्री. भवानी शिक्षण प्रसारक मंडळ उस्मानाबाद, संचलित

**शिक्षण महर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालय, परंडा.**

**"राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर"**

**सन २०२२ -२३ अहवाल**

शिक्षणमहर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२२ -२३ वर्षातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबीराचे आयोजन मौजे आंदोरा ता. परंडा जि. उस्मानाबाद येथे दि. ०६ /०१ /२०२३ ते १२ /०१ /२०२३ या कालावधीत करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर घेण्यात आले. सदर शिबिराच्या उद्धाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्रा. डॉ. मकरंद चौधरी, जिल्हा समन्वयक रा. से. यो. तर उद्धाटक म्हणून मा. संजयजी निंबाळकर, सचिव, श्री भवानी शिक्षण प्रसारक मंडळ, उस्मानाबाद आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल जाधव हे होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कृष्णा परभणे व प्रा. अमरसिंह गोरेपाटील तसेच सहकार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. अरुण खर्डे, प्रा. डॉ. शहाजी चांदनशीवे, प्रा. डॉ. सचिन चव्हाण, प्रा. डॉ. सचिन साबळे इ. उपस्थित होते.

एकंदरीत वरील सात दिवसात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सदर शिबीर हे युवकांसाठी प्रेरणादायी ठरावे म्हणून महाविद्यालाने अनेक उपक्रमांचे आयोजन केले. त्यामुळे सर्व शिबिरार्थी यांच्यात एकत्र राहून एकात्मतेची भावना निर्माण झाली. या शिबिरामध्ये मौजे आंदोरा येथील सरपंच श्रीमती रेखा दयानंद शिंदे , उपसरपंच सौ. वर्षा महावीर कांबळे, इतर ग्रामपंचायत सदस्य, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुमंत उमाप सर या सर्वांचे तसेच इतर ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या सात दिवसाच्या शिबिरात सकाळच्या सत्रात श्रमदान व दुपारच्या सत्रांमध्ये बौद्धिक चर्चा या संदर्भात विविध कार्यक्रम पूर्ण केले. सकाळी ६ ते ७ प्रार्थना व योगासने, ७ ते ८ मध्ये अल्पोपहार, ८ ते १२ पर्यंत श्रमदान, १२ ते २ दुपारचे जेवण, २ ते ३ विश्रांती, दु. ३ ते ४:३० विवध विषयांवर गटचर्चा, सायं. ५ ते ७ या वेळेत विशेष व्याख्यान आणि रात्री ८ ते ९ या वेळेत रात्रीचे भोजन व रात्री ९ ते १० सांस्कृतिक कार्यक्रम असे नियोजन करण्यात आले होते. सर्व शिबिरार्थींना उपरोक्त विविध उपक्रमांत सहभागी करून घेण्यात आले होते. आपत्कालीन व्यवस्थापन, जलसंधारण, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, अंधश्रद्धा निर्मुलन, रक्तदान, बालविवाह प्रतिबंध जनजागृती व्यसनमुक्ती, एड्स जनजागृती आणि विविध ठिकाणी श्रमदान असे उपक्रम घेण्यात आले.

दि. ०६ /०१ /२०२३ रोजी उद्धाटनाचा कार्यक्रम झाल्याबरोबर आंदोरा येथील **जि. प. शाळेतील वर्ग खोल्याची स्वच्छता** करून त्या ठिकाणी सर्व शिबीरार्थ्यांची राहण्याची सोय करण्यात आली. शिबिराच्या या पहिल्या दिवसी उद्धाटन कार्यक्रमास आलेल्या पाहुण्याच्या हस्ते शाळेच्या आवारात चार रोपे लावून प्रातिनिधिक स्वरूपात वृक्षारोपण केले.

दि. ०७ /०१ /२०२३ रोजी स. ८ ते १२ या वेळेत **जि. प. शाळेचा परिसर स्वच्छ** करण्यात आला. दुपारच्या बौद्धिक सत्रात प्रा. डॉ. हरिश्चंद्र गायकवाड यांनी **भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवातील उपलब्द्धी** या विषयावर व्याख्यान दिले.

दि. ०८/००१/२०२३ रोजी स. ८ ते १२ या वेळेत सार्वजनिक पाणीटाकी भोवती असलेली झाड-जुडपे काढली तसेच पाण्याच्या टाकीपासून जाणाऱ्या नाल्याची स्वच्छता करण्यात आली. दुपारच्या सत्रात प्रा. डॉ. शहाजी चंदनशिवे यांनी **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणीक विचार** या विषयावर मार्गदर्शन केले.

दि. ०९/०१/२०२३ वार सोमवार या दिवशी **ग्राम स्वच्छता** करण्यात आली. तसेच आंदोरा गावातील सिद्धार्थ विद्यालयाच्या मैदानातील कचरा काढून स्वच्छता करण्यात आली. गावातील रस्त्याच्या दूतर्फा असलेली जुडपे व गवत काढून, कचरा प्लॅस्टिक वगैरे गोळा करून स्वच्छता करण्यात आली. मंगळवार दुपारच्या बौद्धिक सत्रात मा. भाऊसाहेब सूर्यवंशी यांनी **नव मतदार जनजागृती** या विषयावर व्याख्यान दिले.

दि. १०/०१/२०२३ वार मंगळवार रोजी गावातील रस्त्यावर आडव्या येणाऱ्या **काटेरी वनस्पतीचे निर्मुलन** करण्यात आले तसेच गावातील सांडपाण्याने **तुंबलेल्या गटारी साफ** करण्यात आल्या. सर्व शिबिरार्थ्यांनी बाळू मामा मंदिर येथील पूर्ण परिसर स्वच्छ केला. एकूण ८७ मुलांनी श्रमदान केले. **माझी वसुंधरा या संकल्पनेनुसार** आंदोरा गावात वृक्ष लागवड करण्यात आली. दुपारच्या सत्रात डॉ. भाऊसाहेब माने सर यांचे **बालविवाह प्रतिबंध जनजागृती** या विषयांवर विशेष व्याख्यान आयोजित केले होते.

दि. ११/०१/२०२३ रोजी सकाळी १०:०० वा. **मोफत आरोग्य तपासणी शिबिर** व **रक्तदान शिबीर** घेण्यात आले. रक्त संकलन करणे करिता भगवंत रक्तपेढी बार्शी यांना निमंत्रित करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात शिबिरार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि ग्रामस्थ यांनी मिळून एकून **३७** जणांनी रक्तदान केले.

१२/०१/२०२३ रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत शिबिराचा समारोप समारंभ कार्यक्रम घेण्यात आला. समारोप कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड . संतोष सूर्यवंशी, विधीज्ञ हे उपस्थित होते. या वेळी शिबिरात सहभागी शिबिरार्थ्यांनी व ग्रामस्थांनी शिबिराबाबत आपली मनोगते व त्यांना आलेले अनुभव व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान प्राचार्य डॉ. सुनील जाधव यांनी भूषवले. या कार्यक्रमात कार्यक्रमाधिकारी डॉ. कृष्णा परभणे यांनी एकूण सात दिवसात झालेल्या कामाची माहिती दिली व सह कार्यमाधिकारी विद्याधर नलावडे यानी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले. शेवटी सर्वांनी **राष्ट्रगीत** म्हणून कार्यक्रमाची व शिबिराची सांगता करण्यात आली. या शेवटच्या दिवशी आंदोरा गावच्या ग्रामपंचयाततर्फे सर्व शिबिरार्थी व पाहुणे मंडळीसाठी भोजनाची सोय करण्यात आली होती.

**NSS ची टीम आंदोरा  गावाकडे शिबिरासाठी रवाना होताना.**






शिबिराच्या  उद्घाटन प्रसंगी बोलताना मा. संजयजी निंबाळकरसाहेब



पाहुण्याच्या हस्ते शाळेच्या आवारात वृक्ष लागवड करताना






शाळेचा परिसर सफाई करताना शिबिरार्थी.






**दुपारच्या बौद्धिक सत्रात प्रा. डॉ. हरिश्चंद्र गायकवाड सर 'भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवातील उपलब्द्धी' या विषयावर व्याख्यान देताना.**






ग्रामसफाईसाठी शिबिरार्थी रवाना होताना



ग्रामसफाई करताना  शिबिरार्थी






**आंदोरा  येथे श्रमदान करताना शिबिरार्थी.**







Latitude: 18.310383
Longitude: 75.50579
Elevation: 581.89m
Accuracy: 7.7m
Time: 08-01-2023 10:42



**‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणीक विचार’ या विषयावर शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. शहाजी चंदनशिवे**




**दुपारच्या सत्रात गट चर्चामध्ये सहभागी झालेले विद्यार्थी**



**आंदोरा  येथे श्रमदान करताना शिबिरार्थी.**








मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन करताना प्रा. डॉ. दयानंद शिंदे व इतर मान्यवर






**रक्तदान शिबिरात रक्तदान करताना शिबिरार्थी.**






शिबिरार्थ्यांसाठी जेवण बनवताना






# समारोप कार्यक्रम


Latitude: 18.310337
Longitude: 75.5055
Elevation: 584.29m
Accuracy: 1.5m
Time: 12-01-2023 11:42
Note: NSS Camp Day 7



समारोप कार्यक्रमामध्ये सूत्रसंचालन करताना प्रा. डॉ. सचिन चव्हन व आभार मानताना  प्रा. डॉ. विद्याधर नलावडे .






**शिबिराचा समारोप.**


Latitude: 18.310267
Longitude: 75.50559
Elevation: 586.59m
Accuracy: 2.1m
Time: 12-01-2023 15:18
Note: NSS Camp Day 7


MH 42
M 0799
Latitude: 18.310337
Longitude: 75.50566
Elevation: 584.09m
Accuracy: 1.9m
Time: 12-01-2023 15:18
Note: NSS Camp Day 7

दुपारच्या भोजनाचा आनंद घेताना शिबिरार्थी आणि कर्मचारी






**माझी वसुंधरा या मोहिमे अंतर्गत मौजे आंदोरा येथे वृक्ष लागवड करताना गावकरी आणि शिबिरार्थी.**






.

श्री. भवानी शिक्षण प्रसारक मंडळ उस्मानाबाद, संचलित

# शिक्षण महर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालय, परंडा.

## "राष्ट्रीय सेवा योजना"

### नियमित कार्यक्रम

### सन २०२२ -२३ अहवाल

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या शि. म. गु. रा. गे. शिंदे महाविद्यालय परंडा या महाविद्यालयात सन १९९२-९३ पासून रा. से. यो. विभाग कार्यरत आहे. सन २०२२ -२३ या चालू शैक्षणिक वर्षाकरिता २ एकक म्हणजेच एकूण २०० विद्यार्थ्यांची मान्यता आहे. सदर वर्षाच्या सुरुवातीस २९ -०७ -२०२२ रोजी महाविद्यालयाच्या झालेल्या प्रथम बैठकीत रा. से. यो. विभागाची समिती गठीत करण्यात आली. या बैठकीत प्रा. अमरसिंह बाबासाहेब गोरेपाटील व प्रा. डॉ. कृष्णा नवनाथ परभणे यांची कार्यक्रम अधिकारी म्हणून नियुक्ती केली गेली तसेच इतर चार प्राध्यापकाची सहकार्यक्रम अधिकारी म्हणून निवड करण्यात आली.

रा. से. यो. विभागाच्या पहिल्या बैठकीत अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुनील जाधव व कार्यक्रम अधिकारी यांच्या समवेत वर्षभराच्या विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. महाविद्यालयातील युवक-युवती मध्ये श्रमप्रतिष्ठा निर्माण करणे, समाजसेवेतून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकास घडवणे, सामाजिक जनजागृती करणे, राष्ट्रीय व सामाजिक स्वरुपाची विविध मुल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे ई. साठी विविध कार्यक्रम राबवण्याचे निश्चित करण्यात आले. सदर कार्यक्रम हे विद्यापीठाच्या रा. से. यो. विभागाच्या Academic Calendar प्रमाणे घेण्याचे ठरले. प्रामुख्याने पुढील कार्यक्रम नियोजित केले गेले.

१. ग्रामस्वच्छता अभियान राबवणे
२. श्रमदान करणे
३. महाविद्यालय परिसर स्वच्छता
४. जलसंधारण
५. बालविवाह प्रतिबंद जनजागृती
६. वृक्षसंवर्धन
७. रक्तदान शिबीर
८. अंधश्रद्धा निर्मुलन
९. महिला सबलीकरण
१०. व्यक्तिमत्व विकास
११. स्त्रीभृणहत्या विरोधी मोहीम राबवणे
१२. राष्ट्रपुरुष जयंती व पुण्यातिथी निमित्त कार्यक्रम घेणे
१३. रस्ता सुरक्षा अभियान राबवणे
१४. पर्यावरण संतुलन मोहीम राबवणे
१५. आरोग्य जनजागृती मोहीम राबवणे
१६. एड्स जनजागृती रॅली

रा. से. यो. विभागाचा वार्षिक नियोजनाचा आराखडा तयार करून जुलै २०२२ पासून विद्यापिठाच्या नियमानुसार रा. से. यो. विभागाच्या नियमित कार्यक्रमास सुरुवात केली. जुलै महिन्याच्या सुरुवातीस विद्यार्थ्यांची नोंदणी करून घेतली व सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

३१ जुलै २०२२ रोजी रा. से. यो. विभागाची बैठक घेण्यात आली. या बैठकीत प्राचार्यांनी रा. से. यो. च्या २०२२ -२३ च्या नियमित कार्यक्रमाच्या आराखड्यास मंजुरी दिली. पूर्ण वर्षभरात रा. से. यो. विभागातर्फे नियोजित कार्यक्रमा अंतर्गत पुढील कार्यक्रम घेण्यात आले.

१. महाविद्यालयात रा. से. यो. विभागातर्फे दि. १३ एप्रिल २०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते प्रा. संभाजी धनवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
२. २१ जून २०२२ रोजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला. या प्रसंगी प्रा. डॉ. कृष्णा परभणे यांनी योगासानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.
३. १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट २०२२ या दरम्यान महाविद्यालयात वन सप्ताह साजरा करण्यात आला. वृक्षांच्या फायद्या संदर्भात व्याख्यान आयोजित करण्यात आले. तसेच महाविद्यालयाच्या आवारात वृक्षरोपण करण्यात आले.
४. १२ ऑगस्ट २०२२ रोजी व्यसनमुक्ती दिना निमित्त महाविद्यालयात कार्यक्रम साजरा करण्यात आला. त्यावेळी प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि व्यसन न करण्याबाबत सर्वांना शपत देण्यात आली.
५. १३ ऑगस्ट २०२२ रोजी परांड्याच्या ऐतिहासिक भोईकोट किल्ल्याची स्वच्छता करण्यात आली.
६. 'आजादी का अमृत महोत्सव' अंतर्गत 'हर घर तिरंगा' या उपक्रमाची यशस्वीपणे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना मोफत राष्ट्रध्वज वाटप करून दि. ११ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट ,२०२२ या कालावधीमध्ये घर/दुकान या वर उभारणी करण्यास प्रोत्साहित केले.
७. रा. से. यो. व श्री भगवंत ब्लड बँक बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थापक अध्यक्ष रा. गे. शिंदे गुरुजी, यांच्या जयंती निमित्य दि. ०६ सप्टेंबर २०२२ रोजी रक्तदान शिबिर आयोजित केले होते. यामध्ये २० विद्यार्थ्यांनी रक्तदान करून समाजकार्याला हातभार लावला.
८. २७ सप्टेंबर २०२२ रोजी रा. गे. शिंदे महाविद्यालय परंडा व शासकीय रुग्णालय परंडा यांच्या संयुक्त विद्यमाने मुलींचे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये ६५ मुलीचे आरोग्य तपासणी करण्यात आली.
९. ३ ऑक्टोबर २०२२ रोजी वन्यजीवन सप्ताह निमित्य वृक्ष वाटप व लागवड करण्यात आली.
१०. १ डिसेंबर २०२२ रोजी जागतिक एड्स दिनानिमित्य परंडा शहरात सर्व विद्यार्थ्यांनी घोषणा देत एड्स जनजागरण रॅली काढली.
११. ६ डिसेंबर २०२२ रोजी महाविद्यालयात रा. से. यो. विभागातर्फे महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रा. संभाजी धनवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
१२. ७ डिसेंबर २०२२ रोजी महाविद्यालयात मतदार नोंदणी शिबिर आयोजित करणायात आले होते. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना तहसीलदार मा. दिवणीकरसाहेब मार्गदर्शन केले. तसेच नव मतदार विद्यार्थ्यांची नाव नोंदणी मतदान क्षेत्रस्तरीय अधिकारी(BLO) मा. भाऊसाहेब सूर्यवंशी यांनी करून घेतली.
१३. २५ जानेवरी २०२३ रोजी रा. से. यो. विभागातर्फे राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्य प्रा. डॉ. एच. एम. गायकवाड सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
१४. २६ जानेवारी रोजी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

१५.२७ जानेवरी २०२३ रोजी  झालेल्या परीक्षा पे चर्चा-२०२३  या  कार्यक्रमादरम्यान   मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी  Live विद्यार्थ्यां सोबत विविध विषयावर  संवाद साधला.

१६. रा. से. यो.  च्या स्वयंसेवकनी दि. ९  फेब्रुवारी २०२३ रोजी   महाविद्यालयातील प्लास्टिक, गवत व इतर  कचरा गोळा करून विद्यार्थीनी   स्वच्छता केली.

आंतरराष्ट्रीय योग दिन निमित्त प्रा.  डॉ. कृष्णा परभणे मार्गदर्शन करताना.





महाविद्यालयाच्या आवारात  वृक्षरोपण करताना.  दि.  ०१  ऑगस्ट  २०२२






महाविद्यालयाच्या आवारात  वृक्षरोपण करताना.  दि.  ०१  ऑगस्ट  २०२२






**मुलींचे आरोग्य तपासणी शिबिर. दि . १२ ऑगस्ट २०२२**






## मुलींचे आरोग्य तपासणी शिबिर.  दि . १२ ऑगस्ट २०२२






**व्यसनमुक्ती दिना निमित्त महाविद्यालयात कार्यक्रम साजरा करण्यात आला. त्यावेळी व्यसन मुक्त जीवन जगण्याची शपथ घेताना विद्यार्थी व स्टाफ . दि . १२ ऑगस्ट २०२२**







**व्यसनमुक्ती दिना निमित्त महाविद्यालयात कार्यक्रम साजरा करण्यात आला. त्यावेळी व्यसन मुक्त जीवन जगण्याची शपथ घेताना विद्यार्थी व स्टाफ . दि . १२ ऑगस्ट २०२२**






परांड्याच्या  ऐतिहासिक  भोईकोट किल्ल्याची स्वच्छता  करताना रा. से. यो. चे स्वयंसेवक






**परांड्याच्या ऐतिहासिक भोईकोट किल्ल्याची स्वच्छता करताना रा. से. यो. चे स्वयंसेवक**






हर घर तिरंगा


श्री
रास्त भाव
GPS Map
Camera Lite
5FFR+CC5, Shirala, Maharashtra 413502, India
Latitude
18.1747266666667°
Longitude
75.4909016666666°
Local 09:22:12 AM
GMT 03:52:12 AM
Altitude 487.3 meters
Saturday, 13 Aug 2022


GPS Map
Camera Lite
5FFQ+HVG, Shirala, Maharashtra 413502, India
Latitude
18.1739333333333°
Longitude
75.4895349999999°
Local 09:17:16 AM
GMT 03:47:16 AM
Altitude 487.3 meters
Saturday, 13 Aug 2022

**हर घर तिरंगा**


GPS Map
Camera Lite
Unnamed Road, Shirala, Maharashtra 413502, India
Latitude
18.17693166666667°
Longitude
75.48873499999999°
Local 09:29:06 AM
GMT 03:59:06 AM
Altitude 488 meters
Saturday, 13 Aug 2022



**संस्थापक अध्यक्ष रा. गे. शिंदे गुरुजीच्या जयंती निमित्य आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदान करताना स्टाफ व विद्यार्थी...**






**संस्थापक अध्यक्ष रा. गे.  शिंदे गुरुजीच्या जयंती निमित्या आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदान करताना  स्टाफ  व विद्यार्थी.**






# वन्यजीवन सप्ताह निमित्य वृक्ष वाटप व लागवड






## वन्यजीवन सप्ताह निमित्य वृक्ष वाटप व लागवड






## जागतिक एड्स दिनानिमित्य  एड्स जनजागृतीसाठी काढलेली रॅलीमध्ये सहभागी






## जागतिक एड्स दिना निमित्य एड्स जनजागृतीसाठी काढलेली रॅली






**महापरिनिर्वाण दिन  साजरा**






**महापरिनिर्वाण दिना निमित्य प्रा. संभाजी धनवे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना**






**मतदार नोंदणी शिबिरामध्ये नव मतदार विद्यार्थ्यांची  नाव नोंदणी करताना मतदान क्षेत्रस्तरीय अधिकारी(BLO) मा. भाऊसाहेब सूर्यवंशी**






**मतदार नोंदणी शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना तहसीलदार मा. दिवणीकरसाहेब**






## राष्ट्रीय मतदार दिनानिमित्य मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. एच. एम. गायकवाड सर






# राष्ट्रीय मतदार दिन २०२३ साजरा






## परीक्षा पे चर्चा कार्यक्रमामध्ये मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे Live विद्यार्थ्यां सोबत संवाद






## परीक्षा पे चर्चा कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग






## डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले जयंती साजरी करताना






**डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले जयंती दिना निमित्य प्रा. संभाजी धनवे  विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना**



**महाविद्यालयातील प्लास्टिक, गवत व इतर  कचरा गोळा करताना विद्यार्थी.**






**महाविद्यालय परिसरातील झाड झुडूप काढून  स्वच्छता करताना विद्यार्थी.**

